# देगलूर महाविद्यालयतील दोन खेळाडूंचा आंतर विद्यापीठीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभाग



देगलूर– अमरावती येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या संघात देगलूर महाविद्यालयचे दोन खेळाडूंची निवड झाली आहे. कु. समरता इबीतवार व कु. सपना अल्लापूरकर यांचा यात समावेश आहे.

या खेळाडूंना प्रशिक्षक डॉ.निरजकुमार उपलंचवार यांनी मार्गदर्शन केले आहे. खेळाडूंचे अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंब्रेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सुर्यकांत नारलावार, विलास तोटावार यांच्यासह राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंद्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उप प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, डॉ. बी. आर. कत्तुरवार, प्रा. संग्राम पाटील, गोविंद जोशी यांनी कौतुक केले आहे.

Scanned with OKEN Scanner